# नव्या वर्षात धावण्यासाठी भुयारी मेट्रोचे काम ऑन स्पीड

## डिसेंबरपर्यंत आरेतील कारशेडचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो ३ चे काम वेगाने सुरु असून, आता ओव्हरहेड कॉनटॅक्ट सिस्टीमचे काम ६० टक्के पूर्ण झाले आहे.

या व्यतीरिक्त मेट्रोच्या भूमिगत स्थानकांनी तर पूर्णत्वाच्या बाबतीत बऱ्यापैकी मजल मारली असून, डिसेंबरच्या अखेरपर्यंत आरेतील्या मेट्रो कारशेडचे कामही पूर्णत्वाच्या मार्गावर जाणार आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीला सीप्झ ते वांद्रे या पहिल्या टप्प्यात मेट्रो धावू लागेल, असा दावाही कॉर्पोरेशनने केला आहे.



कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रोचे सुरु असलेले काम.




**५६%** ट्रॅकचे काम १७ मार्चपर्यंत पूर्ण झाले

धारावी मेट्रो स्थानकाचे कामही वेगाने सुरु असून, येथील रस्ते खुले करणे, बांधकाम पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे.



**९८%** धारावी स्थानकाचे काम पूर्ण झाले असून, सिव्हिल वर्क ५४ टक्के पूर्ण झाले आहे.

**८९%** टी १ येथील विमानतळाचे एकूण काम झाले असून, सिव्हिल काम ६० टक्के झाले आहे.

बीकेसी, विद्यानगरी, धारावी, हुतात्मा चौक स्टेशनची कामेही वेगाने सुरू आहेत.

